# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ७७ वा वर्धापनदिन मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ सर्व शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवकांचे विविध गुणदर्शनाचे व सांस्कृतिक कार्यक्रम बुधवार दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाव्दारे असेही कळविण्यात येते की, जे शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर सेवक विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेऊ इच्छित आहेत. अशा शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांनी आपल्या विभाग प्रमुखांमार्फत लेखी अर्ज मंगळवार दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत श्री. संतोष मदने, प्रशासन शिक्षकेतर कक्ष व श्रीमती मेघना माटे, परिक्षा विभाग यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता वेळेची मर्यादा असल्याने प्रथम येणा–यास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच ऐनवेळी येणा–या सादरीकरणास सहभागी होता येणार नाही.

दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत सदर कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणा–या शिक्षक, आधिकारी व शिक्षकेतर सेवकांच्या सादरीकरणाची निवड चाचणी होणार आहे. तसेच दिनांक ६ व ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० यावेळेत अनुक्रमे तालीम व रंगीत तालीम होणार आहे. याची नोंद घेण्यात यावी.

डॉ. चारूशिला गायके
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड
जावकक्र. आर./२/१६
दिनांक : 30 JAN 2026

सोबत : निर्देश
प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी

१. सर्व संबंधित शैक्षणिक विभागप्रमुख } सदरपरिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व
२. सर्व संबंधित प्रशासकीय शाखाप्रमुख } सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे. ही विनंती.